राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

निवडणूक तात्काळ
फॅक्स/ई-मेल

क्र.रानिआ /मनपा-२०१०/प्र.क्र.१०/का.०५,
नवीन प्रशासन भवन, पहिला मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- १९.११.२०११.

प्रति,

१. जिल्हाधिकारी,(सर्व),
(मुंबई व मुंबई उपनगर वगळून)

२. आयुक्त, महानगरपालिका (सर्व)

विषय :- मतदाराच्या बोटाला लावावयाच्या न मिटणा-या शाईच्या बाटलीऐवजी मार्करपेनच्या वापराबाबत.

महोदय,

राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक/पोट निवडणूकांमध्ये मतदाराच्या हाताच्या बोटाला लावण्यात येणा-या शाईऐवजी आता मार्करपेनचा वापर करावयाचा असून सदरहू मार्करपेन वापरताना कोणती दक्षता घेणे आवश्यक आहे याबाबत खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१. मतदाराच्या हाताच्या बोटाला (पृ.क्र.२/प.वि.वरील छायाचित्रात दर्शविल्याप्रमाणे) मार्करपेनने निशाणी करण्यात यावी. मतदाराच्या बोटाला मार्करपेनने निशाणी केल्यानंतर, मतदाराने मतदान केल्यानंतर त्याच्या बोटास केलेली निशाणी तशीच आहे याची खात्री मतदान अधिका-याने, मतदार मतदान केंद्र सोडण्यापूर्वी करावी.

२. मार्करपेन दाबून वापरावा.

३. मार्करपेन वापरात नसेल तेव्हा त्यास घट्ट टोपण लावून ठेवावे.

४. मार्करपेन वापरात नसेल तेव्हा आडवा (**Horizontal**) ठेवण्यात यावा.

२/-

C:\Documents and Settings\kapileshwar\Desktop\15.11.11\E VM rec.doc

J-12431 (262)

निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांना निवडणुकीचे प्रशिक्षण देताना मार्कर पेनचा वापर कसा करावा याबाबत पूर्वपृष्ठावर नमूद केल्यानुसार स्पष्ट सूचना द्याव्यात. (सूचना मार्कर पेनवरही दर्शविण्यात आल्या आहेत.)

आदेशानुसार,

आपला

(सही)

(ध.मा.कानेड)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग

१. उभी रेघ



✓

योग्य

२. टिंब



✗

चुकीचे

J-1243(C 263)